गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १८१ वा | मंगळवार २१ नोव्हेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 181 | Date : 21/11/2023 | blow :Tuesday | Page 4 | Price 4

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हुतात्म्यांना अभिवादन



मुंबई : महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या १०७ हुतात्म्यांना हुतात्मा स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा चौक येथील स्मृतिस्थळावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्याच्या सर्वांगीण विकास करण्याची संकल्पना मांडली.यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, २१ नोव्हेंबर हा महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा दिवस असून यानिमित्त केवळ अभिवादन, पुष्पचक्र अर्पण करून चालणार नाही. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील १०७ हुतात्म्यांच्या बलिदानाच्या आठवणीचा हा दिवस आहे. यावेळी त्यांनी महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्याची ग्वाही दिली.

यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मनपा आयुक्त इक्बाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर आदिंनीही पुष्पचक्र वाहून अभिवादन केले.

# अजित पवार गटाकडून कार्यकर्त्यांचीच नव्हे तर पदाधिकाऱ्यांचीही प्रमाणपत्रे बोगस

## शरद पवार गटाचा युक्तिवाद

मुंबई : अजित पवार गटाकडून केवळ कार्यकर्त्यांचीच नव्हे तर पदाधिकाऱ्यांचीही बोगस प्रमाणपत्र जमा करण्यात आल्याचा दावा शरद पवार गटाने केला आहे. शरद पवार गटाच्या अभिषेक मनु सिंघवी यांनी युक्तिवाद करताना हा दावा केला आहे. तर शरद पवार गटाकडून सातत्याने तेच तेच मुद्दे मांडण्यात येत असून वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप अजित पवार गटाने केला. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाकडून आजचा युक्तिवाद संपला असून पुढची सुनावणी २४ नोव्हेंबर रोजी होणार आहे. राष्ट्रवादी पक्ष कुणाचा, पक्षावर दावा कुणाचा याची सुनावणी निवडणूक आयोगात सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुरू असलेल्या सुनावणीसाठी शरद पवार गटाकडून अभिषेक मनु सिंघवी युक्तिवाद करत आहेत तर अजित पवार गटाकडून नीरज किशन कौल आणि मनिंदर सिंह युक्तिवाद करत आहेत.

शरद पवार स्वतः या सुनावणीसाठी उपस्थित असून त्यांच्यासोबत खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार जितेंद्र आव्हाड उपस्थित आहेत. तर अजित पवार गटातर्फे पार्थ पवार निवडणूक आयोगात उपस्थित आहेत.

केंद्रीय निवडणूक आयोगाने शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांची कानउघडणी केली. ज्या मुद्द्यांवर गेल्या सुनावणीत आपण युक्तिवाद केला होता त्याचं प्रतिज्ञापत्राच्या मुद्द्यांचा आपण पुन्हा उल्लेख करु नका असं निवडणूक आयोगाने सांगितलं. तेच तेच मुद्दे घेतल्याने आयोगाने नाराजी व्यक्त केली.

राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सरचिटणीस कुवर प्रताप सिंह हे शरद पवार गटाकडे आहेत. तसं प्रतिज्ञापत्रकही त्यांनी दिलं आहे. असं असताना अजित पवार गटाकडून कुवर प्रताप सिंह यांची खोटी सही करून त्यांचं बोगस प्रतिज्ञापत्रक जमा करण्या आलं असल्याचा दावा शरद पवार गटाकडून करण्यात आला आहे. अजित पवार गटाकडून खोटी कागदपत्रं जमा करून निवडणूक आयोगाची दिशाभूल करण्यात येत असल्याचा दावा सरद पवार गटाकडून करण्यात आला.



शरद पवार गटाच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद अजित पवार गटाकडून खोडून काढण्यात आला. शरद पवार गटाकडून सातत्याने खोटी माहिती दिली जात आहे आणि तेच ते मुद्दे मांडले जात असल्याचं अजित पवार गटाने म्हटलं आहे. या माध्यमातून शरद पवार गटाकडून वेळकाढूपणा केला जात आहे, त्यामुळे ही केस निकाली काढावी अशी मागणीही अजित पवार गटाने केली आहे.

शरद पवार गटाकडून अजित पवार यांच्या अध्यक्ष पदाच्या निवडीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आला. जर शरद पवार यांच्या अध्यक्षपदाच्या निवडीवेळी अजित पवार यांनी प्रस्तावक म्हणून सही केली होती. मग दहा महिन्यात नेमकं काय झालं की त्यांनी अध्यक्षपदी दावा केला असा सवाल विचारला. अजित पवार राष्ट्रीय अध्यक्ष कधी झाले? अध्यक्ष पदाच्या निवडीबाबत राष्ट्रीय अधिवेशन कधी घेतले? अध्यक्षपदासाठी त्यांनी अर्ज कधी केला ती तारीख काय होती? अध्यक्षपदाच्या निवडी वेळी निवडणूक निर्णय अधिकारी कोण होते? असे प्रश्न शरद पवार गटाच्या वकिलांनी अजित पवार गटाला केले. अजित पवार यांच्या अध्यक्षपदाच्या निवडी बाबतच्या बैठकीचं कव्हरेज कोणत्या चॅनलवर पाहिला मिळालं का? असा सवालही शरद पवार गटाकडून करण्यात आला.

## धानाला नागपूर हिवाळी अधिवेशनात बोनस जाहीर करणार

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमात घोषणा

भंडारा : भंडारा जिल्ह्यातील धान हे प्रमुख पीक आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी धानाला बोनस देण्याची मागणी होत आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन सातत्याने काम करीत आहे. त्यामुळे नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात धानाला बोनस जाहीर करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केली.




'शासन आपल्या दारी' अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यक्रम चैतन्य पोलीस मैदान, भंडारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी ही घोषणा केली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित, खासदार सुनील मेंढे, आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार राजू कारेमोरे, माजी मंत्री परिणय फुके, माजी खासदार शिशुपाल पटले, मधुकर कुकडे, माजी आमदार नानाभाऊ पंचबुद्धे, चरण वाघमारे, विशेष पोलीस महानिरिक्षक छेरिंग दोरजे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी, पोलीस अधीक्षक लोहित मतानी उपस्थित होते.

धान हे जिल्ह्यातील प्रमुख पीक आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी धानाला बोनस जाहीर करावा, अशी विनंती उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आपल्या भाषणातून केली होती. त्यानुसार नागपूर अधिवेशनात बोनस जाहीर करण्याची ग्वाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा धान जलदगतीने खरेदी होणे आवश्यक आहे. त्यासाठी खरेदी केंद्रे सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनास दिले.सध्या शेत ई-पीक पाहणी कार्यक्रम राबविला जात आहे. प्रत्येक शेतकऱ्यांना ई-पीक **। पान २ वर**

## राज्यासह देशात थंडीचा कडाका वाढला!

मुंबई : बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे देशातील हवामानात बदल झाला आहे. राज्यासह देशात थंडीचा कडाका वाढला आहे. तर काही ठिकाणी पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. केरळ, माहे, अंदमान आणि निकोबार बेटांवर आणि तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलवरील वेगळ्या ठिकाणी लक्षणीय पावसाची नोंद झाली आहे. केरळमध्ये कोझिकोड, तिरुवनथपुरम, कोट्टायम, इडुक्की, त्रिशूर तर तामिळनाडूमध्ये नागपट्टिनम, थुथुकुडी, कराईकल या भागात आजही पावसाची शक्यता आहे. राज्यासह देशात थंडीचा कडाका वाढताना दिसत आहे. मध्य महाराष्ट्रासह राज्यात इतर भागात गारवा वाढला आहे. महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील तापमान कमालीचं घसरलं आहे. मुंबई, ठाणेसह कोकण किनारपट्टीसह गोव्यात गारठा वाढला आहे. छत्तीसगड, तेलंगणा, रायलसीमा, किनारपट्टी आंध्र प्रदेश आणि यानाम आणि अरुणाचल प्रदेशात बहुतांश ठिकाणी कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त आहे. झारखंड आणि आसाम आणि मेघालयमध्ये अनेक ठिकाणी, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटकमध्ये काही ठिकाणी तसेच जम्मू-काश्मीर-लडाख-गिलगिट-बाल्टिस्तान-मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, कोकण आणि गोवा, तामिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकल, केरळ आणि माहे, ओडिशा, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा आणि उप-हिमालय पश्चिम बंगाल आणि सिक्कीम तापमान सामान्यपेक्षा कमी आहे.

## १९२ तासांनंतरही बचावकार्य सुरुच, बोगद्यात अडकले ४१ मजूर; टनलबाहेर नातेवाईकांचा आक्रोश

नवी दिल्ली : उत्तराखंडच्या उत्तरकाशीमध्ये बोगदा कोसळल्याने ४१ मजूर ८ दिवसांपासून अडकले आहेत. शुक्रवारी दुपारी २ वाजल्यापासून बंद केलेले सिल्क्यरा येथून ड्रिलिंग रविवारी दुपारी ४ वाजता म्हणजेच ५० तासांनंतर पुन्हा सुरू झालं. टनलमध्ये अडकलेल्या मजुरांसाठी येथून आतमध्ये अन्न पाठवण्यासाठी आणखी एक छोटा पाइप ड्रिल करण्यात आला आहे. या दुर्घटनेला आठ दिवस उलटले आहेत. मात्र, अद्यापही मजुरांची सुटका झालेली नाही. जसेजसे जास्त तास उलटत आहेत. तसतसं मजुरांचं मनोधैर्य खचत आहे. आमची लवकर सुटका करा, अशी मजुरांची मागणी आहे.

उत्तरकाशी जिल्ह्यातील सिल्क्यरा येथील बोगद्यात अडकलेल्या कामगारांना वाचवण्यासाठी आणखी वेळ लागू शकतो. बोगदा बांधकाम तज्ज्ञांच्या मते, बोगदा कोसळल्यानंतर मलबा हटवण्याच्या चुकीमुळे बचावकार्याचा वेळ वाढला आहे. सध्याची परिस्थिती पाहता कामगारांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी आणखी पाच



दिवस ते एक आठवडा लागू शकतो.

जसजसे दिवस जात आहेत, तसतशी घरातील सदस्यांची चिंताही वाढत आहे. अडकलेल्या अनेक मजुरांचे कुटंबिय रविवारी सिल्क्यरा येथे पोहोचले. उत्तर प्रदेशच्या मोतीपूर काला येथून सिल्क्यरा येथे आलेल्या लोकांमध्ये अशोक चौधरी यांचाही समावेश आहे. अशोकने सांगितले की, बोगद्यात अडकलेल्या लोकांमध्ये त्याचा मोठा भाऊ संतोष चौधरी देखील आहे. आपल्या भावाला प्रोत्साहन देण्यासाठी तो येथे आला आहे. त्याच्या मोठ्या बहिणीनेही त्याला भावाला घेऊनच घरी येण्यास सांगितलं आहे. अशोकने सांगितलं की, त्याचा मोठा भाऊ संतोष चार महिन्यांपूर्वी गावातील काही तरुणांसह कामानिमित्त येथे आला होता. अपघाताची माहिती कुटुंबीयांना मिळाल्यापासून सगळेच चिंतेत आहेत.

## पंढरपूर नगरपरिषदेची कार्तिकी यात्रा २०२३ साठी यंत्रणा सज्ज.

अवघ्या महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असलेल्या श्री.क्षेत्र पंढरपूर येथे दि.२३/११/२०२३ रोजी कार्तिकी यात्रा भरत असुन येणा-या लाखो भाविक वारक-यांना सेवा सुविधा पुरविण्याकामी मा.जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, नगरपरिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी गजानन गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर नगरपरिषदेची यंत्रणा सज्ज झाली असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी दिली.

पंढरपूर शहरामध्ये येणा-या लाखो भाविकांना चांगल्या सेवासुविधा देण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी वेळोवेळी सुचना दिल्या होत्या त्यानुसार यात्रेकरुंना यात्रा कालावधीमध्ये खालीलप्रमाणे सुविधा देण्यात येणार आहेत. नगरपरिषदेने प्रदक्षिणा रस्त्याचे पॅचवर्क डांबरीकरणाद्वारे केले आहे. शहरातील इतर रस्ता दुरुस्तीची कामे यापुर्वी करण्यात आली असुन अर्बन बँक ते नाथ चौक, स्वा.सावरकर पुतळा ते महाद्वार, मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, अंबाबाई पटांगण, चंद्रभागा वाळवंट व इतर रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली असुन पोलीस प्रशासनाच्या मदतीने अतिक्रमण काढण्याचे काम युद्ध पातळीवर चालु आहे. तसेच शहरामध्ये येणारी वाहने मुख्य रस्त्यावर किंवा प्रदक्षिणा मार्गावर येवुन भाविकांना चालताना अडथळा अथवा त्रास होवु नये





म्हणुन सर्व ठिकाणी लोखंडी बॅरिकेटिंग करण्यात आलेले आहे. तसेच यात्रेच्या निमित्ताने पंढरपूर शहरामध्ये भाविकांच्या मोठ्या प्रमाणात येणा-या वाहनांची सोय व्हावी म्हणुन १५ ठिकाणी मोफत पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

तसेच वाळवंटात येणा-या यात्रेकरुंना चालण्यासाठी व पाण्याचे टँकर, जेटिंग मशीन, आरोग्य विभागाची वाहने जाणे-येणेसाठी जुना पुल ते पुंडलिक मंदीरापर्यंत आखणी करण्यात आली आहे. तसेच पुंडलिक मंदीर ते दगडी पुलापर्यंत ९ हायमास्ट दिवे, प्रत्येक घाटासमोर असलेल्या लोखंडी पोलवर २०० वॅट एलईडी दिवे लावण्यात आले असुन सदर दिव्यांचा प्रकाश संपुर्ण वाळवंटात पडणार आहे. त्याचप्रमाणे यात्रेकरुंच्या सोईसाठी संपुर्ण दर्शन बारी मार्ग, ६५ एकर मध्ये १६० एलईडी दिवे व ६ हायमास्ट बसविण्यात आले आहेत. तसेच ६५ एकर मध्ये असलेल्या १२ युनिटमध्ये असलेल्या १८०० शौचालयामध्ये विजेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अनिल नगर येथील पाण्याच्या टाकीवरुन स्वतंत्र पाईप लाईन द्वारे यात्रेकरुंना पिण्याचे पाणी मिळावे या हेतुन नदीच्या वाळवंटामध्ये ७५ नळ बसविण्यात आले आहेत. तसेच वाळवंटात, ६५ एकर व पत्राशेड दर्शनबारी येथे विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली असुन यात्रेपुर्वी संपुर्ण वाळवंट दोनवेळा स्वच्छ करणेत आले असुन दररोजच्या दररोज नदीपात्र स्वच्छ राहण्याच्या दृष्टीने सफाई कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच नदी पात्र, पत्राशेड दर्शनबारी, ६५ एकर, मंदिर परिसरात व शहरात आगीची दुर्घटना होवु नये म्हणुन ५ महत्वाच्या ठिकाणी २४ तास अग्निशमन वाहने उभी करण्यात आली आहेत. पत्रा शेड, नविन अग्निशमन केंद्र, चंद्रभागा नदी वाळवंट तसेच मंदीरा भोवती आग लागल्यास अग्निशमन वाहनास त्वरीत पाणी उपलब्ध व्हावे म्हणुन मंदीराच्या दक्षिण बाजुस फायर हायड्रेंट उभा केला आहे. भाविकांसाठी यात्रा कालावधीमध्ये मंदीर परिसरात दोन वेळा पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. गोपाळपुर रोड दर्शन बारी पत्रा शेडमध्ये पिण्याचे पाणी नळ कनेक्शन द्वारे उपलब्ध करुन दिले आहे. या ठिकाणी आतील बाजुस शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरात एकुण ६५ हातपंप व मंदिर परिसरातील १२ विद्युत पंपाद्वारे यात्रेकरुंना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच यात्रा कालावधीत पिण्याचे पाणी किमान १८ टँकर द्वारे संपुर्ण शहरात विशेष: ज्या ठिकाणी मठांची संख्या जास्त आहे त्याठिकाणी पाणी पुरविण्यात येणार आहे. यात्रा कालावधीत पुर्वी शहरामध्ये विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली असुन यात्रा कालावधीमध्ये शहरात स्वच्छता रहावी म्हणुन नियोजन बद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे. नगरपरिषदेच्यावतीने १४०० सफाई कर्मचा-यांद्वारे शहरात व उपनगरात स्वच्छता करण्यात आली आहे. तसेच यात्रा कालावधीमध्ये शहर, वाळवंट, ६५ एकर, पत्रा शेड दर्शनबारी येथे दररोजच्या दररोज स्वच्छता करण्यात येत आहे. प्रत्येक मोठ्या **। पान २ वर**

# संपादकीय

## संस्कारांची उजळणी..

स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या अकराव्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला दादरच्या शिवाजी पार्क येथील स्मृतिस्थळासमोरच शिवसैनिक शिवसैनिकाला भिडल्याचे दयनीय दृश्य बघायला मिळाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसैनिक एक शिंदे गट आणि ठाकरे गट अशा दोन गटांत विभागले गेले आहेत. शिवसेनेतील फुटीपासून ते आजपर्यंत शिवसैनिक अनेकदा एकमेकांसमोर उभे ठाकलेत. मुख्यत्वेकरून शिवसेना शाखा ताब्यात घेण्यासाठी दोस्ती-यारी सर्वकाही विसरलेत. अनेक वर्षे एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून काम केलेल्या शिवसैनिकांची हमरीतुमरीपासून एकमेकांची डोकी फोडण्यापर्यंतची मजल गेल्याचे वेळोवेळी दिसले आहे. १७ नोव्हेंबर हा बाळासाहेबांचा स्मृतिदिन असल्याने या दिवशी त्यांना अभिवादन करण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून असंख्य शिवसैनिक दरवर्षी शिवाजी पार्क येथील स्मृतिस्थळावर येतात. शिवसेनेतील फुटीनंतर बाळासाहेबांच्या नावाने राजकारण करणाऱ्या दोन्ही गटातील नेत्यांसाठी बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळासमोर नतमस्तक होणे ही अतीव श्रध्देची बाब बनली आहे. शिंदे बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेऊन गेल्यावर ठाकरे गटाचे नेते आणि आमदार ॲड. अनिल परब, खासदार अनिल देसाई आपल्या शिवसैनिकांना घेऊन शिवाजी पार्क येथे हजर झाले. यावेळी शिंदे गटाच्या आरोपांनुसार ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी स्मृतिस्थळाचे गोमूत्र शिंपडून शुद्धिकरण करण्याचा प्रयत्न केल्यावर वादाला सुरुवात झाली. यावेळी मुंब्र्यात उध्दव ठाकरेंना अडवण्यात पुढे असलेले शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के, आमदार सदा सरवणकर आणि शीतल म्हात्रे तेथे उपस्थित होते. त्यांना पाहून खवळलेल्या ठाकरे गटाच्या आणि शिंदे गटाच्या शिवसैनिकांमध्ये वादावादी सुरू झाली. घोषणाबाजी करत कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावून गेल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी राज्य राखीव दलाची अतिरिक्त कुमक मागवून परिस्थिती नियंत्रणात आणली. या राड्यानंतर बोलताना ठाकरे गट आणि शिंदे गटाच्या नेत्यांनी एकमेकांवर बाळासाहेबांचे विचार आणि संस्कार विसरल्याचा जोरदार आरोप केला. या दोन्ही गटातील नेत्यांचे दावे ऐकून एकेकाळी राडा संस्कृतीच्या जोरावर राज्यात पक्षाची पाळेमुळे मजबूत केलेल्या कडवट शिवसैनिकांनी तसेच सध्याच्या राजकारणात आपापला गट धरून सत्ताकारणाची स्वप्ने बघणाऱ्या ताज्या दमाच्या शिवसैनिकांनी बाळासाहेबांचे विचार आणि संस्कारांची उजळणी करण्याची गरज नाही.

# संविधान जागृती करणाराच राष्ट्रप्रेमी

हल्ली राष्ट्र प्रेमीची व्याख्याच बदलून गेली आहे. काही गोष्टींचा आणि देशाचा, देशातील सर्व सामान्य लोकांचा काहीच फायदा नसुन तो जबरदस्ती संबंध देशाशी , देशातील जनतेशी जोडून राष्ट्रप्रेम दाखवले जाते. लोकांना तसे भावनिक केले जाते. परंतु ज्यांचा प्रत्यक्ष संबंध देश व देशाच्या सर्वसामान्य नागरीकांशी असून प्रत्येक भारतीयांना मान सन्मान स्वाभिमान व सामाजिक संस्कार घालणाऱ्या अनेक बाबी जाणीव पुर्वक दुर्लक्षित केल्या जाते ही खुप मोठी शोकांतिका आहे. त्यापैकी च एक सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे भारतीय संविधान. भारतीय संविधान हे सर्वोच्च असून संविधानानुसार च देशाचा कारभार चालत असतो. संविधानाचा सन्मान करने हेच सर्वात मोठे राष्ट्रप्रेम आहे. ज्या संविधानाने माणसाला माणसात आणुन सर्व हक्क अधिकार बहाल करून, विषमता व भेदभाव नष्ट करून प्रत्येकाला भारतीय बनवले. तेच संविधान राष्ट्रीय ग्रंथ आहे. व त्याच संविधानाचा सन्मान करणे आणि संविधाना विषयी जागृती करणे यालाच राष्ट्र सन्मान व राष्ट्रभक्ती म्हणतात. परंतु देशातील एक कटू सत्य आहे की बहुतांश लोकांनी भारतीय संविधान वाचलेच नाही, काही खुप लोकांनी संविधान बघितलेही नाही. अशा लोकांना राष्ट्रप्रेमी म्हणणे म्हणजे निव्वळ मुर्खपणा होय. विषमतेच्या घाणीत फसलेल्या आणि तीच घाण चांगली वाटणाऱ्या लोकांना राष्ट्रप्रेमी बोलणे म्हणजे स्वतः च केलेला राष्ट्रद्रोह होय. ह्या गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे. अनेक धर्मांध, जातीवादी लोकांना आजही वाटत असेल संविधान एकाच जातीसाठी आहे, संविधान बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून वाचायचे कशाला? घरात आणायचे कशाला अशी बुद्धीहीन लोकांना माणूस म्हणणेही गुन्हाच आहे. संविधान निर्मात्याची बुद्धीमत्ता, विद्वता, ज्ञान व कार्य न बघता केवळ जात बघून संविधान आणि बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून न घेता केवळ जातीमुळे दुर करत असतील तर हा देशद्रोह आहे. देशद्रोही लोकांना राष्ट्रप्रेमी म्हणणे म्हणजे केवळ मुर्खपणा होय. कोणालाही राष्ट्रप्रेमी म्हणायचे असेल तर सर्वात अगोदर त्याला भारतीय संविधान व संविधानाचे शिल्पकार बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करावाच लागणार आहे. हे बंधनच आहे. जसे आपण ज्या घरात राहतो त्या घरात बाप हा आपल्या पेक्षा श्रेष्ठ असतो. बापाचे मत ऐकणे, बापाने दिलेले संस्कार स्विकारणे हे लेकराचे काम असते. बापाच्या घरात राहून कोणी अस म्हणत असेल की मी बापाला मानतो तर याचा अर्थ काय? हे समजून घेणे आवश्यक आहे. संविधानाने सामाजिक संस्कारासह हक्क अधिकार बहाल करून त्याचे संरक्षण केले, मानसाला मान सन्मान मिळवून दिला तरी स्वतः ला बुद्धीमान समजणारे, गुणवंत समजणारे लोक संविधानाच्या ज्ञाना विषयी एवढे माघास आहेत की त्यांच्या बुद्धीची किव येते. अशा लोकांचा बौद्धिक विकास होईल की नाही याची शंका मनात येते. कारण समता, बंधुता, हक्क न्याय बहाल करून संरक्षण करणारे आणि देशातील विविधतेला एकतेमध्ये बंदिस्त करणारे सर्वोच्च संविधान यांना माहिती नसते. परंतु विषमता, पाखंड, अन्याय, माणसिक गुलामी निर्माण करणारे ग्रंथ साहित्याचे हे मोठ्या रुबाबात उदाहरण देतात तेव्हाच लक्षात येते यांना देश महत्त्वाचा नाही, देशातील सुखी समाधानी जनता महत्वाची नाही तर यांना हजारो वर्षांपासून चालत आलेली गुलामगिरी व बौद्धिक लाचारी मान्य आहे. म्हणून अशा विचार सरणीच्या लोकांना राष्ट्रप्रेमी अजिबात समजता कामा नये. संविधान राष्ट्रीय ग्रंथ आहे म्हणून त्याचा सन्मान व्हायलाच पाहिजे परंतु संविधानामुळे वैयक्तिक प्रगती होऊन वैयक्तिक मानसन्मान मिळाला याची जाणीव म्हणून वैयक्तिक पातळीवर संविधाना विषयी जाणीव पाहिजे. संविधाना पुर्वीची सर्व सामान्य माणसाचे जिवन निव्वळ पशू प्रमाणे होते व जाती व्यवस्थेने हिन लेखुन अपमानास्पद वागणूक दिलेली होती. ज्याला स्वतः च्या खानदानाचा इतिहास माहिती नाही त्यांना संविधान कळणार नाही. म्हणजे संविधान कळण्यासाठी आपल्याला आपल्या पुर्वजांनी जगलेले आयुष्य लक्षात घेणे महत्वाचे आहे. महात्मा फुले यांना वराती मधुन बाहेर काढणे असो, छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक नाकारला जाणे असो, शाहु महाराज वेदोक्त प्रकरण असो, तुकाराम महाराजांचा मृत्यू असो, गाथा इंद्रायणी मध्ये बुडवणे असो, असे उदाहरणे प्रामाणिक पणे बघितले तर लक्षात येईल जेथे राजे, संत आणि वैचारिक महापुरुष यांना जातीमुळे छळले गेले. एवढेच नव्हे तर संविधाना अगोदर मानसाला एवढी हिन वागणूक मिळायची की नाव तर बरोबर घ्यायचे नाही परंतु द्वेषात्मक घेतलेल्या नावामागे जात लाऊन बोलायचे. तुक्या, सक्या, दगड्या, कचऱ्या, धोंड्या, किसन्या असे नाव उच्चारून त्यांच्या समोर कुंभार, माळी, साळी, तेली, कुणबी, धनगर, मांग, चांभार अशी जात लावली जायची. आजही घरातील वंशवाळ बघितली तर असेच दिसते. आणि असे जेथे दिसते त्या कुळाचा उद्धार बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून केला हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. आता नावा समोर जात लाऊन हिनवले जात नाही. आडनाव लाऊन सन्मान केला जातो. ज्या संविधानाने मान सन्मान स्वाभिमान दिला, शिक्षण रोजगार सुविधा दिली, अनेक अधिकार दिले, जनतेला राजा बनवले याची जाणीव ज्यांना नसेल त्यांना राष्ट्रप्रेमी म्हणायचे कसे? राष्ट्रप्रेमी होण्यासाठी राष्ट्राचा अर्थ समजून राष्ट्राचा व राष्ट्रीय संपतीचा सन्मान तर करता आला पाहिजे. संविधान केवळ देश चालण्याचे पुस्तक नाही. करोडो कुळांचा उद्धार करण्याचा एकमेव महामार्ग आहे. नोकरी, शिक्षण, आरक्षण, हक्क अधिकार हे सर्व संविधानाने दिलेले आहे. संविधाना पुर्वी तर शाळा शिकणेही पाप समजले जायचे म्हणून तर शाळा नव्हत्या. ब्रिटिशांनी शाळा सुरू करून दिल्या आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार दिला. संविधानाने दिलेले हक्क अधिकार व सुख सुविधेचा फायदा घेऊनही संविधाना बद्दल अज्ञानी असणाऱ्या लोकांना राष्ट्रप्रेमी कसे म्हणता येऊ शकते. जेव्हा संविधानाचे उल्लंघन होते तेव्हा एकही शब्द न बोलणाऱ्यांना राष्ट्रप्रेमाचे प्रमाणपत्र कोण देते? देशाचा विचार सोडून द्या महाराष्ट्रात ५२५ पेक्षा जास्त जातींना आरक्षण असुन जेव्हा आरक्षणाचा मुद्दा येतो तेव्हा एकाच जातीकडे बघून आरक्षणा विषयी चुकीची मांडणी करणाऱ्यांना आणि आरक्षणामुळे गुणवंत विद्यार्थ्यांना संधी मिळत नाही जेव्हा असे बिनबुडाचे उदाहरणे दिली जातात तेव्हाही एकच जात समोर येते बाकीच्या ५२५ पेक्षा जास्त जातींना काहीच वाटत नसेल तर ही बौद्धिक मागासले पण आहेच परंतु संविधानाने दिलेल्या आरक्षणावर चुकीचे बोलणारा आणि आरक्षण घेऊन गप्प बसणाऱ्यांना राष्ट्रप्रेमी कस कोणत्या आधारावर म्हणता येईल? जे लोक संविधानाचे वाचन करत नाहीत, संविधान घरात आणत नाहीत, संविधान घरात आणायची लाज वाटते अशा लोकांना देशद्रोही म्हणावे की राष्ट्रप्रेमी? संविधाना बद्दल जागृत होऊन संविधानाचा प्रचार आणि प्रसार करतो तोच खरा राष्ट्रप्रेमी. २६ नोव्हेंबर, २६ जानेवारी जवळ येताना किमान एक सप्ताह तरी जो कोणी संविधाना विषयी तन मन धनाने प्रचार आणि प्रसार करतो तो खरा राष्ट्रप्रेमी. बोलण्यातून, वागण्यातून दररोज संविधानाचा सन्मान व प्रचार व्हायला च पाहिजे तोच खरा भारतीय व तोच खरा राष्ट्रप्रेमी. परंपरा अनेकांना २६ नोव्हेंबर आला काय गेला काय काही घेण देण नसते. बरेच जन २६ जानेवारी ला केवळ सुट्टी चा दिवस म्हणून इंजॉय करतात. काही काही बौद्धिक दारीद्र्यात फसलेले लोक २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिवस म्हणून ध्वजारोहण करून साजरा करतात परंतु भारतीय संविधान व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख ही करत नाहीत. अशा बौद्धिक, मानसिक दारिद्र्यात जाणीव पुर्वक फसलेल्या लोकांना राष्ट्रप्रेमी समजने म्हणजेच राष्ट्रद्रोह होय. राष्ट्रप्रेमी कोणाला म्हणायचे, खरा भारतीय कोण कसा ओळखायचा तर सार्वजनिक जिवन जगताना जात धर्म पंथ लिंग याचा विचार न करता संविधाना नुसार वागतो, ज्याला संविधान, संविधानाने दिलेले मुल्य, व संविधानाचे शिल्पकार यांच्या बद्दल व राष्ट्रीय संपती आणि राष्ट्रीय प्रतिकांबद्दल आदर आहे. तोच खरा भारतीय व तोच राष्ट्रप्रेमी होय. ज्या बाबींचा देश व देशातील सार्वजनिक संस्थेशी काहीच संबध नसताना जबरदस्ती जोडणे व मुळ मुळ भारतीय अभिमानाच्या बाबींना बाजूला सारणे केवळ बौद्धिक मागासलेपणा होय.

**विनोद पंजबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## पंढरपूर नगरपरिषदेची कार्तिकी

मठांमध्ये स्वतंत्ररित्या कचरा साठविण्यासाठी लेखी पत्राद्वारे सुचना देण्यात आलेल्या असुन कोणत्याही परिस्थितीत कचरा बाहेर टाकु नये सर्व कचरा घंटागाडी कडे द्यावा म्हणुन कळविण्यात आले आहे. तसेच ४१ घंटागाडी द्वारेही कचरा गोळा करण्याचे काम यात्रा कालावधीत अहोरात्र चालु राहणार आहे. शहरामध्ये कचरा त्वरीत उचलण्यासाठी आरोग्य विभागाकडील ४ टिपर, २ कॉम्पॅक्टर, १ डंपरप्लेसर, ४ डंपिंग ट्रॉलिने व जेसीबीच्या सहाय्याने दररोज १०० ते १२० टन कचरा उचलण्यात येणार आहे. नदीपात्र, ६५ एकर, पत्राशेड दर्शन बारी व शहरात गर्दीच्या ठिकाणी ७०० पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उभारण्यात आली आहेत. तसेच नागरी हिवताप विभागामार्फत शहरामध्ये डेंगु अथवा इतर आजाराचा प्रादुर्भाव होवु नये म्हणुन विशेष मोहिम हाती घेतली असुन कंटेनर सर्व्हे, औषध फवारणी व फॉगिंग मशीन द्वारे धुर फवारणी करण्यात येत आहे.

बायोकल्चर तंत्राचा वापर करुन जैविक पद्धतीने नदीच्या पात्रात होणारी घाण दुर्गंधीयुक्त वास कचरा व घाण कुजविण्याच्या दृष्टीने फवारणी करण्यात येत आहे. शौचालय नियोजनामध्ये तिर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत व सुलभ शौचालयाची २९ ठिकाणी २०५४ सीट्स, नगरपरिषदेची कायमची २५ ठिकाणी १७६ सीट्स, ६५ एकर परिसरातील कायम स्वरुपी १२ ठिकाणी १८६४ सीट्स, प्री फॅब्रिकेटेड (नदी वाळवंट, ६५ एकर, पत्राशेड दर्शनबारी, शहरात विविध ठिकाणी) असे एकुण १७ ठिकाणी ७०० सीट्स असे शौचालयाचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच यात्रा कालावधीत मोकाट जनावरे पकडुन त्यांना शहराबाहेर सोडण्यात आले आहे.

शहरात यात्रा कालावधीमध्ये पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने, उपजिल्हा रुग्णालय व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने पत्राशेड दर्शनबारी येथे २ (आयसीयु १), पोलीस संकुल, दर्शन मंडप, ६५ एकर , चंद्रभागा वाळवंटात ३ यामध्ये १ आयसीयु , वेदांत भक्त निवास, नागरी आरोग्य केंद्र काळा मारुती व सारडा भवन, श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात २ असे एकुण १३ ठिकाणी यात्रेकरुंच्या सोईसाठी प्रथमोपचार केंद्र उघडण्यात आले आहेत. तसेच यात्रा कालाधीमध्ये संपुर्ण यात्रेवर नियंत्रण ठेवण्यासाठी ६५ एकर, नदी वाळवंट, गोपाळपुर रोड दर्शन बारी पत्रा शेड, पंढरपूर नगरपरिषद मुख्य कार्यालय अशा ४ ठिकाणी आपातकालिन व्यवस्थापन केंद्राची (एजउ) स्थापना केलेली आहे. यात्रा व्यवस्थित पार पडावी म्हणुन पंढरपूर नगरपरिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी गजानन गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव, उपमुख्याधिकारी सुनिल वाळुजकर, नगरअभियंता नेताजी पवार, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, आरोग्य निरीक्षक नागनाथ तोडकर, पाणीपुरवठा अभियंता राजकुमार काळे, अभियंता प्रविण बैले, सुहास झिंगे, सोमेश धट, कर अधिकारी सुप्रिया शिंदे, जनसंपर्क अधिकारी अस्मिती निकम, विद्युत अभियंता राजकुमार सपाटे, रोडलाईट इन्स्पेक्टर संतोष क्षिरसागर, अग्निशमन अधिकारी संभाजी कार्ले, हिवताप अधिकारी शुभांगी अधटराव, कार्यालय अधिक्षक जानबा कांबळे, सभा अधिक्षक बाजीराव जाधव, सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी प्रयत्नशील आहेत. तसेच यात्रा कालावधीमध्ये शहरातील सर्व स्थानिक नागरीकांनी स्वच्छता व आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी केले आहे. **– पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर**

## धानाला नागपूर हिवाळी अधिवेशनात

पाहणी करता यावी, त्यासाठी भंडारा जिल्ह्यात पीक पाहणीच्या कार्यक्रमास ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याची घोषणा देखील यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केली. समृध्दी महामार्गाचा भंडारा, गोंदिया, गडचिरोलीपर्यंत विस्तार करण्यात येत आहे. या मार्गाच्या डीपीआरचे काम गतीने होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

भंडारा जिल्हा नैसर्गिक वैविध्यता लाभलेला जिल्हा आहे. पर्यटनवाढीला या जिल्ह्यात मोठी संधी आहे. जिल्ह्यात पितळ उद्योग क्लस्टर उभारण्याची मागणी होत आहे. जिल्ह्याच्या पर्यटनासह उद्योग वाढीसाठी आवश्यक त्या बाबी करण्यास शासन कटीबद्ध आहे. सर्वसामान्य गरीब लाभार्थ्यांना त्यांच्या दारी जावून योजना बहाल करण्याचा हा कार्यक्रम असून राज्यात १ कोटी ८४ लाख लाभार्थ्यांना कार्यक्रमाने थेट लाभ मिळवून दिला आहे.

सर्वसामान्य शेतकरी, कष्टकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर कामे केली जात आहेत. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आपण केवळ एक रुपया भरून पीकविम्याचा लाभ देण्याची योजना सुरु केली. लाखो शेतकऱ्यांच्या पिकाला या योजनेने संरक्षण दिले. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'नमो शेतकरी सन्मान' योजना सुरु केली. केंद्र शासनाने ६ हजार आणि राज्य शासनाच्या योजनेचे ६ हजार असे १२ हजार रुपये राज्यातील शेतकऱ्यांना दिले जात आहेत. अशा प्रकारची योजना राबविणारे महाराष्ट्र देशातील पहिलेच राज्य असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.आपत्तीच्या काळात नुकसानग्रस्तांना चांगली मदत देता यावी म्हणून एनडीआरएफचे नियम बाजूला ठेऊन अधिक मदत देण्याचे धोरण स्वीकारले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला. पूरबाधित कुटुंबांना १० हजार रुपये भरपाई देण्यात येत आहे. सततच्या पावसामुळे होणारे नुकसान आपण नुकसान भरपाईच्या टप्प्यात आणले. सर्वसामान्य गरीब कुटुंबांना शस्त्रक्रिया, उपचारांसाठी दिलासा देण्याकरीता महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत आता ५ लाख रुपयांपर्यंत उपचार मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमध्ये महिलांना भाड्यात ५० टक्के सवलत, ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना संपुर्ण मोफत प्रवास असे विविध जनकल्याणकारी निर्णय घेतले. येत्या काळात सर्वसामान्य नागरिक, लाभार्थ्यांना आपल्या कामासाठी शासकीय कार्यालयात जावे लागणार नाही. घरबसल्या सर्व सुविधा त्यांना मिळतील, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना दिवसाला १२ तास वीज देऊ – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

कृषी पंपांना दिवसा पुरेशी वीज मिळणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांसह सर्वच स्तरावरून ही मागणी होत आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरु केली. आगामी काळात कृषी फिडर सौरऊर्जेवर टाकून शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज पुरवठा उपलब्ध करून दिला जाणार आहे, असे यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.शासकीय योजना सर्वसामान्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'शासन आपल्या दारी' हे अभियान राबविण्यात येत आहे. भंडारा हा तलाव, जंगल, वने तसेच धानाचा जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पर्यटनासह उद्योग विकासासाठी प्रयत्न करीत आहोत. राज्याने शेतकऱ्यांसाठी केवळ एक रुपया भरून सुरु केलेल्या सर्वसमावेशक पीकविमा योजनेत पहिल्याच वर्षी १ कोटी ६६ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर दिलासा देणारी ही योजना ठरली आहे.

शासनाने अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, मदतनिसांचे मानधन वाढविले. पोलिस पाटलांच्या मानधन वाढीचा देखील विचार सुरु आहे. शासनाने शिष्यवृत्तीची रक्कम वाढविली. ओबीसी घटकांकरीता मोदी आवास योजना सुरु केली असून ओबीसीसाठी १० लाख, तर अनुसूचित जाती, जमातीसाठी ५ लाख घरांचे उद्दिष्ट ठेवले आहे. सर्वसामान्यांना घर मिळाले पाहिजे, अशी शासनाची भूमिका आहे. भंडारा जिल्ह्यात अंभोरा येथे ३५२ कोटी रुपयांचा जल पर्यटन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्याच्या पर्यटनासह रोजगार निर्मितीला प्रोत्साहन मिळेल. गोसीखुर्द राज्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. केंद्र शासनाने देखील या प्रकल्पाला निधी उपलब्ध करून दिला आहे. २०२४ च्या शेवटपर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण करून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देऊ, असे उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.

एक हजार ९५४ कोटींच्या अग्रिमाचे वाटप – उपमुख्यमंत्री अजित पवार

यावर्षीपासून महत्वाकांक्षी सर्वसमावेशक पीकविमा योजना सुरु केली. योजनेंतर्गत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्यभर अग्रीम रक्कमेचे वाटप केले जात आहे. नुकसान भरपाईसाठी ४७ लाख ६३ हजार अर्जांना मंजुरी देण्यात आली असून आतापर्यंत १ हजार ९५४ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. या योजनेसाठी यावर्षी पहिल्यांदाच १ कोटी ७१ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शून्य टक्के व्याजाने पीककर्ज, पूरग्रस्तांना दुपटीने आर्थिक मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. भंडारा जिल्ह्यात धान पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. शेतकऱ्यांनी धानासोबतच नगदी पिके देखील घेतली पाहिजेत. भंडारा येथे वैद्यकीय महाविद्यालय व्हावे, अशी मागणी होती, ती पूर्ण करण्यात आली आहे. लवकरच निविदा काढून महाविद्यालयाचे बांधकाम सुरु केले जाईल, असे उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले. जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी प्रास्ताविक केले. 'शासन आपल्या दारी' अभियान कालावधीत जिल्ह्यात २ लाख ९ हजार ७५६ लाभार्थ्यांना विविध विभागांच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. देण्यात आलेल्या लाभाची रक्कम ३०४ कोटी रुपये एवढी आहे. एकट्या महसूल विभागाने या कालावधीत ९९ हजार दाखल्यांचे वितरण केले असल्याचे ते म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री कार्यालयातील जनकल्याण कक्षाचे प्रमुख डॉ.अमोल शिंदे यांनी 'शासन आपल्या दारी' अभियानाची भूमिका व फलनिष्पत्ती याबाबत माहिती दिली.सुरुवातीस मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांसह मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी रिमोटची कळ दाबून शासन आपल्या दारी कार्यक्रमाचा शुभारंभ केला. यावेळी विविध योजनेच्या २७ लाभार्थ्यांना विविध लाभांचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. भंडारा जिल्ह्यातील १६८ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमीपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमस्थळी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विविध नामांकित कंपन्यांच्यावतीने त्यांच्याकडील रिक्त १ हजार ५०० जागांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीद्वारे निवड झालेल्या निवडक उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. सर्वसामान्य नागरिकांना निवेदन, तक्रार, म्हणणे सादर करता यावे यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाच्यावतीने स्वतंत्र दालन लावण्यात आले.

**हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# संत नरहरी प्रतिष्ठानचा पुरस्कार वितरण संपन्न

## वटवृक्ष देवस्थान अध्यक्ष महेश इंगळे यांच्यासह पत्रकार राजेश जगताप, नंदकुमार जगदाळे, अरविंद पाटील यांचा झाला सन्मान



अक्कलकोट/प्रतिनिधीः संत नरहरी प्रतिष्ठान व चंद्रकांत वेदपाठक सामाजिक मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारताच्या अमृत महोत्सव काळात राज्य स्तरीय ७५ कर्तुत्वान आदर्श व्यक्तीचा स्मृती चिन्ह गौरव पुरस्कार वितरण व ७५ गरीब निराधार महिलांना साडी व धान्य वाटपाचा उपक्रम अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे चंद्रकांतदादा वेदपाठक यांचे कार्य सर्व समाजाला प्रेरणादायी व दिपस्तंभासारखे असल्याचे गौरवोद्गार वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी काढले.

संत नरहरी प्रतिष्ठान व चंद्रकांत दादा वेठपाठक सामाजिक मित्र मंडळ यांच्या वतीने राज्यातील ७५ विविध क्षेत्रातील आदर्श व्यक्ती चा स्मृती चिन्ह देऊन गौरव व ७५ गरीब निराधार महिलानां साडी व धान्य वाटप व प्रत्येकी रुपए शंभरची भाऊबीज मदतीचा चा कार्यक्रम पहिल्या सत्रामध्ये - ला राजशेखर कापसे सिद्धया मठ राजेद्र हत्ते रोटरीचे आनंदकुमार गंदगे उपअधिक्षक विजयालक्ष्मी कुरी ओंकारेश्र्वर उटगे पोनि स्वामी संजय देशमुख मान्यवरांच्या उपस्थिती .. सर्जेराव सभागृह येथे संपन्न झाला . दुपारच्या सत्राचे पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे उद्धाटन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले .

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विरक्त मठाचे म नि प्र बसवलिंग स्वामीजी होते . व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती मध्ये वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे उमेश काशीकर जगदिश महामुनी स्वराज पोलीस मित्र मंडळ अधिकार संघटना जिल्हा अध्यक्ष दिनेश काटकर स्वामीनाथ हेगडे राजेश पंडित धनश्री उत्पात विनोद भोसले पांचाळ समाज लातुर जिल्हाध्यक्ष विजयकुमार दिक्षित नरहरी प्रतिष्ठान लातुर जिल्हा सचिव बाळासाहेब दिक्षित मिलिंदकुमार महामुनी भारतीय नरहरी प्रतिष्ठान अध्यक्ष राजेश पंडीत विजयकुमार पोतदार .

नगरसेवक अशपाक बळोरगी माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोळे प्रांतपाल राजशेखर कापसे आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती .

. या मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्काराने झाला गौरव

..स्वामी समर्थ राज्यस्तरीय सेवा पुरस्कार

महेश इंगळे श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले सुरेश पुजारी महाराज

रमेश निलेगावकर राघवेंद्र बागेवाडीकर संतोष पंडीत माणिक मंद्रुपकर इंजिनियर राजशेखर बोदले गुरुनाथ पोतदार महेश सेडम मिलिंद पंडीत नंदकुमार पोतदार आदर्श पत्रकार नंदकुमार जगदाळे अरविंद पाटील राजेश कुमार जगताप विरुपाक्ष कुभार अरुण जाधव नुरअहमद बागवान वसंतराव पोतदार सुप्रिया वेदपाठक अतुल जाधव अँड सापटणेकर माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे बसलिंग खेडगी माजी विरोधी पक्षनेता अशपाक बळोरगी माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोळे यशवंत धोंगडे मिलन कल्याणशेट्टी नरेश रेवणकर मिलिद पोतदार कविता छिरसागर गणेश छिरसागर डॉ मामीन पिरजादे डाँ अशोक राठोड डॉ मलगोंडा प्रा कडबगावकर प्रा . फैजुनिसा डांगे ऐश्र्वर्या वेदपाठक मुकुंद वेदपाठक संजय माणकापुरे संतोष दिक्षित वैशाली हावनुर आदि ७५ मान्यवरांचा सन्मानपत्र गौरव चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लायन्स क्लब अक्कलकोट माजी अध्यक्ष पत्रकार सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत वेदपाठक यांनी केले . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विठ्ठल वेदपाठक राहुल वेदपाठक ओंकार वेदपाठक किरण वेदपाठक स्वामीनाथ हेगडे आकाश वेदपाठक स्वामीराव गायकवाड दिपक पोतदार अनिल वेदपाठक अनिल पवार सागर वेदपाठक स्वामीनाथ हरवाळकर दशरथ हरवाळकर रवि गोरे संतोष वगाले दिनेश माने सुरेश वेदपाठक साईनाथ होटकर आकाश वेदपाठक सागर वेदपाठक गुरुपादप्पा हरवाळकर रवि धर्माधिकारी रवि गोरे चंद्रकांत हुंडेकरी आदिनी परिश्रम घेतले

# दिपावली फराळ कार्यक्रम रद्द करुन विविध ठिकाणी ३० पाण्याच्या टाकी बसवून दिले

## मैंदर्गी येथील समाज सेवक महेश शावरी यांच्या कार्याचे कौतुक



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील भीषण पाण्याची टंचाई लक्षात घेवून सालाबादाप्रमाणे घेण्यात येणारी दिपावली फराळ कार्यक्रम रद्द करुन श्री बसवेश्र्वर चॅरिटेबल ट्रस्ट व एम.एस. युथ फाऊंडेशनच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी ३० पाण्याच्या टाकी बसवून शहरवासियांचे सोय करुन दिल्याबद्दल महेश शावरी यांच्या कार्याचे कौतुक व स्वागत होत आहे.

मैंदर्गी शहरातील विविध महिला मंडळ, ज्येष्ठ नागरिक व शहरवासियांनी फाऊंडेशनचे अध्यक्ष महेश शावरी यांना प्रत्यक्ष भेटून सालाबादाप्रमाणे घेण्यात येणारी दिपावली फराळ कार्यक्रम रद्द करुन शहरातील विविध भागात पाणी टाकीबरोबरच पाण्याचे नियोजन करण्याची मागणी केली असता तात्काळ शावरी यांनी यास प्रतिसाद देत पाणी टाकी बरोबरच पाईपलाईन, नळ व इतर साहित्य उपलब्ध करुन पाणीप्रश्र्न सोडविले.पाणीटंचाई निर्माण होत असल्याने त्या अनुषंगाने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना माजी नगरसेवक, समाजसेवक व नेते मंडळी यांनी पाण्याची टंचाई त्वरित मार्गी लावा म्हणून निवेदने देण्यात आली. परंतु पालिका प्रशासनाने याचे गांभीर्य न घेता केवळ चालढकल करीत असल्याचे महेश शावरी यांच्या निदर्शनास आले. त्यांनी शहरवासियांचे होत असलेल्या त्रासाबद्दल स्वखर्चाने गावातील विविध भागात ३० सींटेक्स टाकी बसवून जेथे मिळेल तेथून पाण्याचे नियोजन करून गावकर्यांची पाणी टंचाई कमी भासू नये म्हणून पाणी टाकीबरोबरच पाण्याची सोय करुन दिल्याने महेश शावरी यांच्या कार्यालचे कौतुक व स्वागत होत आहे.

गावात अनेक नेते पाण्याचं प्रश्र्न सोडवण्यास अनेक अथक प्रयत्न करून सुध्दा शेवटी कोणतेही बदल घडताना दिसत नव्हते म्हणून शेवटी महेश शावरी यांनी निवेदने किंवा प्रशासनच्या मागे न लागता स्वतः ग्राउंडवर उतरून प्रत्येक गल्लीत भेटी देऊन नागरिकांच्या पाण्याबाबत अडीअडचणी विचारात घेऊन स्व-खर्चाने पाण्याची टाकी, पाइपलाइन, नळ व इतर पाणीपुरवठा साधने आणून गावच्या पाण्याची समस्या दूर करण्यास एम.एस. युथ फाऊंडेशनकडून कार्य सुरु आहे. चावडी गल्ली, सिंदगी गल्ली ,कडगंची गल्ली, सुभाष गल्ली, जय भवानी गल्ली येथे पाण्याचे टाकी बसविले आहेत.

पुढे ज्या- ज्या ठिकाणी नागरिकांची पाणी टाकी मागणी असेल तेथे सर्व ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यास कट्टीबद्ध असल्याचे सांगून आणखीन शहरातील पाणी टाकी हवे असल्याचे संपर्क साधण्याचे आवाहन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महेश शावरी यांनी केले आहेत.

# खालिंग येथे आदिवासी पड्यात फराळ व साडी वाटप

भिवंडी/मिलिंद जाधव :खालिंग बुद्रुक येथे भरत भाऊ विठ्ठल शेलार (शिवसेना उपतालुका प्रमुख भिवंडी , माजी उपसरपंच खालिंग बुद्रुक) व शरवरी शरद शेलार (उपसरपंच खालिंग बुद्रुक) यांच्या संकल्पनेतून दिपावली पाडव्याच्या मुहूर्तावर गावातील सर्व आदिवासी महिलांना साडी, फराळ देण्यात आला. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक,आणि आरोग्याच्या समस्या जाणुन घेवुन त्या समस्या नक्कीच सोडवल्या जातील असे आसुन यापुढे हि असेच सामाजिक काम अविरत चालु राहील असे आश्र्वासन खालिंग बुद्रुक येथे भरत भाऊ विठ्ठल शेलार (शिवसेना भिवंडी ऊपतालुका प्रमुख) यांनी दिले असून सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाला गावातील राजाराम शेलार (सरपंच)शरवरी शरद शेलार (उपसरपंच) अशोक शेलार (माजी सरपंच) अविनाश शेलार (इंजिनीअर) सुप्रिया शेलार (सदस्य) किशोर



शेलार ,मनोहर शेलार,डॉ विकास शेलार ,डॉ प्रशांत शेलार, रोहिदास शेलार, मोहन शेलार इंजिनीअर नरेश शेलार, तर आदी मान्यवर उपस्थित होते.

# सिन्नुर येथे सर्व धर्मीय लोकांनी मिळून साजरी केली टिपु सुलतानचे जयंती

दुधनी/निंगप्पा निंबाळकरः अक्कलकोट तालुकामधील सिन्नुर गावात शेर-ए-हिंद हजरत टिपु सुलतान यांचा २७३ वी जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सुरूवातील राजाअहमद पठाण यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये कार्यक्रमाचे रुपरेषा सांगितले.प्रथमता हजरत टिपु सुलतान यांचा प्रतिमेचे पुजन महम्मद हैदरसाहेब गौडगांव यांचा शुभ हस्ते करण्यात आला.त्यानंतर ध्वजारोहण अध्यक्ष महिबुब सैय्यदसाहेब डिग्गी यांचा शुभ हस्ते करण्यात आला.उपास्थित मान्यवरांचा हस्ते ढ.ड.युवा ग्रुपचे फलक अनावरण करण्यात आले.त्यानंतर सत्कार मुर्तीचे सत्कार करण्यात आले.शिष्यवृत्ती परिक्षेत राज्यात प्राविण्य पटकविल्याबद्दल जि.प.प्राथमिक कन्नड शाळा सिन्नुर येथील १३ विद्यार्थी व विद्यार्थीनीचे सत्कार, व सोलापूर जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



श्री.अंबाराय रामण्णा उजनी सर, अक्कलकोट तालुका आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित सौ.बडगर मँडम, सेवानिवृत अंगनवाडी सेविका सौ.पुतळाबाई निलकंट कण्णी मँडम या सत्कार मुर्तीचे भव्य नागरी सत्कार मान्यवरांचा हस्ते करण्यात आले.यावेळी लिंगराज होदे, अशोक कण्णी, जगदीश उजणी, रमेश उजणी, हाजीमलंग मुल्ला, रवि जेवर्गी, शिका जेवर्गी, बसप्पा सोनकांबळे, बाळप्पा कांबळे यांचासह आशा सेविका, ग्रामपंचायतचे सदस्यगण, पोलिस पाटील, गावातील सर्व समाजाचे नेते मंडळी गावकरी मोठ्यासंख्याने उपास्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजासाहब पठाण यांनी केले तर मक्तुम पटेल यांनी आभार मांडले.ढड ग्रुपचा वतिने सुरकुम्बा व लाडू वाटप करण्यात आले.

# दिक्षवाणी समाजातर्फे १०वी १२वी च्या गुणवंत विद्यार्थी नवनियुक्त नोकरदार व निवृत्त कर्मचारी यांचा सत्कार संपन्न



दुधनी / निंगप्पा निंबाळ :दुधनी येथील विरशैव लिंगायत दिक्षवाणी समाजातर्फे दुधनीतील १०वी १२वी गुणवंत विद्यार्थी, नवनियुक्त नोकरदार व निवृत्त कर्मचारी यांचा सत्कार दुधनीचे मठाधीश डॉ. श्री. नि. प्र.शांतलिंगेश्र्वर महास्वामीजी यांचे हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सोमण्णा ठक्का व उपाध्यक्ष राजशेखर सोळसे यांनी केले तर प्रास्ताविक भाषण सिध्दाराम नुला आणि सुत्रसंचालन गुरुशांत उप्पीन यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा नावे पुढीलप्रमाणे कु.निकीता शिवयोगी ठक्का चि.शुभम यनबसप्पा ठक्का कु. नेहा शिवयोगी ठक्का चि.विनायक शरण शिलवंत कु.अंकिता सातलिंगप्पा खुबा चि.यशवंत शामराव कत्ते नवनियुक्त नोकरदारांचे नावे पुढीलप्रमाणे कु.पार्वती शिवानंद उप्पीन विलास बसवराज हिरोळी सुजान बसवराज हिरोळी निवृत्त कर्मचारी यांची नावे पुढीलप्रमाणे चन्नमलप्पा भिमाशंकर पाटील शिवलिंगप्पा शिवप्पा गिण्णी ईरण्णा शरणप्पा मंथा बसवराज शांतप्पा मंथा चन्नबसप्पा यशवंतप्पा मंथा यावेळी निंगण्णा सोळसे, पार्वती शीवाद, निकिती ठक्का, विनायक शिलवंत, श्रीशैल माशाळ इ.आपले मनोगत व्यक्त केले तर सिध्दाराम सावळगी यांनी आभार व्यक्त केले या कार्यक्रमास दिक्षवाणी समाजातील युवा वर्ग, महिला इ.मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विलेपार्ले प्रेमनगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती द्यावी : मुख्यमंत्री

मुंबई : विलेपार्ले प्रेमनगर येथे झोपडपट्टी पुनर्वसनाच्या जागेवर होत असलेली अतिक्रमणे तातडीने काढून यासाठी जबाबदार असलेल्या संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई करावी, असे निर्देश देतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथील पुनर्विकासाच्या कामाला गती देण्याचे निर्देश गृहनिर्माण विभागाला दिले. मुंबईत कोणत्याही परिस्थितीत नव्याने झोपड्या आणि अनधिकृत बांधकामे होऊ नयेत यासाठी पालिका आणि पोलीस प्रशासनाने जागरूक राहून समन्वयाने कारवाई करावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले. सर्वसामान्य, गोरगरीब नागरिकांना घरे मिळवीत म्हणून आपण निर्णय घेतले आहेत त्यामुळे विकासक विनाकारण अडवणूक करत असतील तर नियमानुसार लगेच कारवाई करा, असेही निर्देश त्यांनी दिले.

विलेपार्ले प्रेमनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व सांताक्रूझ खार पूर्व येथील शिवालिक व्हेंचर्सच्या प्रकल्पासंदर्भात आज सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. माजी मंत्री रामदास कदम, गृहनिर्माणच्या अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर, झोपडपट्टी पुनर्वसनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश लोखंडे, पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, कुणाल सरमळकर, प्रेमनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कृष्णा कदम व इतर प्रतिनिधी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी आदी उपस्थित होते.प्रेमनगर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेचा पुनर्विकास त्वरित करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण विभाग आणि झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने योग्य ती पावले तातडीने उचलावीत तसेच याठिकाणाहून निष्कासित करण्यात आलेल्या १४०७ पैकी ८५० झोपडीधारकांना गेल्या आठ वर्षांपासून भाडे मिळालेले नाही.

हे भाडे ६१ कोटी असून नव्याने निश्र्चित होणाऱ्या विकासकाकडून हे थकीत आणि पुढील भाडे नियमानुसार मिळाले पाहिजे अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. थकीत भाडे मिळत नसल्याच्या प्रश्र्नावरून



उच्च न्यायालयात याचिकेवर सुनावणी प्रलंबित आहे. काही व्यक्ती येथील झोपडीधारकांची दिशाभूल करीत असून त्यांच्याकडून पैसेही घेत असल्याच्या तक्रारी आहेत त्यावर पोलिसांनी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत लगेच कारवाई करावी, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

सांताक्रूझ खार (पूर्व) येथे गोळीबार भागात शिवालिक व्हेंचर्सतर्फे पुनर्विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. याठिकाणी असलेल्या संक्रमण शिबिरात राहणाऱ्या झोपडीधारकांच्या गैरसोयी दूर करून त्यांच्या अडचणी सोडविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला दिले. येथील निष्कासित करण्यात आलेल्या ७५०० झोपडीधारकांना नियमानुसार थकीत आणि चालू भाडे मिळेल हे पाहण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# शिवसेनेचे आमदार; नितीन देशमुख यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणीचे सह पत्नीक दर्शन



पंढरपूर/प्रतिनिधीः रविवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ रोजी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे बाळापूर मतदारसंघाचे विद्यमान आमदार श्री नितीन देशमुख यांनी सहकुटुंब श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने आमदार श्री नितीनजी देशमुख यांचा सत्कार समितीचे सदस्य उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे जिल्हाध्यक्ष पंढरपूर विभाग श्री संभाजी शिंदे यांचा यांच्या हस्ते श्रीची प्रतिमा उपरणे दैनंदिनी देऊन सत्कार करण्यात आला याला त्यावेळी मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते

# कार्तिक यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरातील अतिक्रमण हटाव विशेष मोहीम युद्ध पातळीवर

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहरामध्ये कार्तिक यात्रेनिमित्त विविध कामे हाती घेण्यात आलेले असून येणाऱ्या भावी भक्तांना सांगली सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने प्रशासन कामाला लागले असून शहरांमध्ये येणाऱ्या नागरिकांना व भाविकांना रस्त्यावर चालताना अडथळा होऊ नये म्हणून शहरातील अतिक्रमणे पाठवण्याची विशेष मोहीम हाती घेतल्याने मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव यांनी सांगितले दि २३ नोव्हेंबर रोजी कार्तिक यात्रेच्या निमित्ताने अनेक व्यवसायिकांनी फुटपाथ व रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केलेले आहेत.या अतिक्रमानामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे तसेच भाविकांची रस्त्यावरून चालताना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे म्हणून पंढरपूर नगर परिषदेने शहरातील अतिक्रमणे काढण्याबाबत युद्ध पातळीवर विशेष मोहीम हाती घेतले आहे चंद्रभागा वाळवंट महाद्वार घाट प्रदर्शना मार्ग महाद्वार पोलीस चौकी ते नामदेव पायरी ते गोपाळकृष्ण मंदिर संपूर्ण स्टेशन रोड गजानन महाराज मठ महात्मा फुले पुतळा व्हीआयपी रोड ६५ एकर गोपाळपूर रोड दर्शन बारी येथील सर्व अतिक्रमणे काढण्यात येत असून उपविभागीय अधिकारी



तथा नगर परिषदेचे प्रशासन गजानन गुरव व मुख्य अधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर नगरपालिकेचे नगर अभियंता नेताजी पवार, नगर रचना सह अभियंता सोमेश धाट सुवास झिंगे नवनाथ पवार या अतिक्रमण काढण्याचे विशेष मोहीम राबवत आहेत

# पंढरपुरातील तुळशी वृंदावन भाविकांसाठी चालू करावे ग्राहक पंचायतीची मागणी

पंढरपूर/प्रतिनिधीः कार्तिक यात्रेत तरी तुळशी वृंदावन सुरू व्हावे तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील बंद असलेले तुळशी वृंदावन भाविकांना पाहण्यासाठी लवकरात लवकर खुले करावे अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत पंचायत तिने वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी पंढरपूर यांच्याकडे केले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत यांनी दिली



तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांना नागरिकांना पाहण्यासाठी पर्यटन स्थळ म्हणून वन विभागाने तुळशी वृंदावनाची निर्मिती केली असल्याने महाराष्ट्रातील विविध संतांची मंदिरे विठ्ठलाला प्रिय असणाऱ्या विविध प्रकारच्या तुळशीची लागवड इतर फुलझाडे तसेच संतांची भीतीचित्रे यांच्या कार्याची सविस्तर ओळख व माहिती सर्वांना व्हावी त्याचबरोबर कारंजे म्युझिक लाईट त्याच परिसरातील असलेल्या लाईट त्याच परिसरात असलेल्या अशा प्रकारे भाविकांना आनंद मिळवण्यासाठी येथे प्रयत्न केले आहेत मात्र काही महिन्यापूर्वी त्यातील काही मंदिराची पडझड झाल्याने विकसित केलेले हे तुळशी वृंदावन मागील सहा महिन्यापासून बंद आहे याबाबत वन विभागाकडे संपर्क साधला असता तुळशी वृंदावन केव्हा सुरू होईल याबद्दलचे निश्रिचती माहिती मिळू शकली नाही फक्त सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुरुस्तीचे काम चालू आहे असल्याचे समजते

सध्या कार्तिक यात्रेमध्ये विविध मार्गावरून भाविकांनी पंढरपूरसाठी प्रस्थान केलेले आहे त्यामुळे पंढरपूर मध्ये भाविकांची गर्दी होत आहे आलेले भाविक दर्शन घेऊन तुळशी वृंदावन पाहण्यासाठी परिवारासह येथे जात आहेत व प्रत्यक्ष या ठिकाणी गेल्यानंतर तुळशी वृंदावन दुरुस्तीसाठी बंद ठेवण्यात आले आहे असा फलक पहावयास मिळतो सोबत आलेली लहान मुले महिला यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे यासाठी वन विभागाने तातडीने भाविकांसाठी तुळशी वृंदावन खुले करण्यात यावे याबद्दलची उत्तर पत्रात प्रसिद्धी देऊनही माहिती जनतेपर्यंत भाविकांपर्यंत पोहोचवण्याची अशी मागणी प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरती जिल्हा संघटक दीपक इरकल जिल्हा सचिव सुहास निघते तालुकाध्यक्ष विनय उपाध्ये महेश भोसले उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे यांनी केली आहे

# कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा या जातींचा नामोल्लेख दस्ताऐवज २४ नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे आवाहन

मुंबई : मुंबई शहर जिल्ह्यातील नागरिकांकडे कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा या जातींचा नामोल्लेख असलेले उपलब्ध दस्ताऐवज/ पुरावे आहेत त्यांनी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष मोहिमेदरम्यान २१ ते २४ नाव्हेंबर या कालावधीत सादर करण्याचे आवाहन मुंबई शहरचे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) कल्याण पांढरे यांनी केले आहे.मराठा आरक्षणासंदर्भात न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीद्वारे प्राप्त निर्देशानुसार मुंबई शहर जिल्ह्यातील नागरिकांकडे १९४८ पूर्वीचे तसेच १९४८ ते १३ ऑक्टोबर १९६७ या कालावधीतील कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा या जातींचा नामोल्लेख असलेले पुरावे, वंशावळ, शैक्षणिक व महसुली पुरावे, जुन्या सनदा, राष्ट्रीय दस्तावेज इत्यादी जुने अभिलेखे उपलब्ध असल्यास अशा नागरिकांकडून याबाबतचे उपलब्ध अभिलेख मुंबई जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयातील तळ मजल्यावरील नियोजन भवन येथे २१ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत विशेष कक्षात स्वीकारले जाणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी श्री. पांढरे यांनी दिली आहे. अधिक माहितीसाठी ०२२-२२६६४२३८ किंवा gadmumbaicity@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधवा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# शेरे ए हिंद शहीद टिपू सुलतान यांच्या जयंती निमित्त फळे व मसाला दूध वाटप

अक्कलकोट /सोहेल फरास : वयाच्या अठराव्या वर्षी इंग्रज़ाविरोधात पाहिले युद्ध जिंकणारे कर्नाटक (म्हैसूरचे राजे) थोर स्वातंत्र्य सेनानी भारतातील पाहिले लढाऊ रॉकेट निर्माता शेर ए म्हैसूर टिपू सुलतान रहे यांच्या जयंती निमित्ताने हजरत टिपू सुलतान फाउंडेशन अक्कलकोट तर्फे अक्कलकोट शहरातील विजय कामगार चौक येथे मोठ्या उत्साहात शेरे ए हिंद शहीद टिपू सुलतान यांची जयंती साजरी करण्यात आली.



यावेळी अक्कलकोट शहरातील हिंदू-मुस्लिम बांधव शहरातील समाजसेवक नगरसेवक व हजरत टिपू सुलतान यांचा चाहता वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हजरत टिपू सुलतान प्रतिमेस सर्व मान्यवरांच्या उपस्थिती पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले. व आलेल्या मान्यवरांचा टिपू सुलतान फाउंडेशन अक्कलकोट तर्फे फेटा बांधून व पुष्पगुच्छ देऊन सन्मानही करण्यात आला. व त्यानंतर सर्व मान्यवरांच्या शुभ हसते फळे मसाला दूध व लाडू वाटप करण्यात आले.

यावेळी अक्कलकोट शहरातील उपस्थित मान्यवर, हजरत टिपू सुलतान फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष:- सद्दाम शेख,उपाध्यक्ष:- मशाक शेख, कार्याध्यक्ष :- सैफन शेख, व इरफान दावांना, नगरसेवक सद्दाम शेरीकर, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष, चंद्रशेखर मडीखांबे, आरपीआय आठवले गट अध्यक्ष अविनाश मडीखांबे, अल्पसंख्याक शहराध्यक्ष नंनु कोरबु,शिवराज स्वामी,सलीम येळसंगी, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास,रशिद खिस्तके,मुबारक कोरबु,विशाल ठोंबरे समीर शेख ,सैफन शेख, बुडन तांबोळी, हुसेन बळोरगी, सैपन पठाण,फारुख बबर्ची,अल्तमस गोळसगावकर,आयाज चंदनवाले,अतिक बागवान,वसीम कुरेशी,शहेबाज यळसंगी, हुसेन बागवान, असीम बागवान,सैफन हगलदिवटे,अझर जंगी,महिबूब शेख,अकिब बागवान, आर एम मुल्ला आदी मान्यवर उपस्थित होते. हजरत टिपू सुलतान फाउंडेशन चे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सर्व परिश्रम घेतले,व हजरत टिपू सुलतान फाउंडेशन अक्कलकोट जयंतीचे अध्यक्ष सद्दाम शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मंगळवेढा तालुक्यातील उपसरपंच निवडी शुक्रवारी

मंगळवेढा/प्रतिनिधीः तालुक्यातील २७ ग्रामपंचायतींच्या उपसरपंच निवडीचा कार्यक्रम २४ नोव्हेंबर रोजी एकाच दिवशी होणार आहे. गटविकास अधिकारी शिवाजीराव पाटील यांनी सोमवारी ही घोषणा केली आहे. यासाठी निवडलेले अधिकारी पुढीलप्रमाणे : लक्ष्मीदहिवडी (आर. बी. गोरे), खुपसंगी (एम. टी. भोसले), आंधळगाव (एन. ए. करे), नंदूर (आर. ए. म्हेत्रे), निंबोणी (एस. एन. संकपाळ), रड्डे (पी. एन. शिवशरण), ब्रह्मपुरी (एस. बी. शिंदे), मानेवाडी (एस. के. इनामदार), जुनोनी (टी. के. कांबळे), डिकसळ (आर. के. कांबळे), पडोळकरवाडी (ए. डी. चलवादी), अकोला (डी. ए. स्वामी), शिरसी (आर. एस. जाधव), देगाव (एस. डी. लेंडवे), बठाण (पी. सी. कांबळे), शेलेवाडी (पी. बी. ढोबळे), उचेठाण (डी. व्ही. पवार), खडकी (ए. टी. कोळेकर),

लोणार (आर. एस. सोनवणे), मुंढेवाडी (जे. वाय. मुलाणी), जंगलगी (आर. एस. मदभावी), भाळवणी (एस. एस. खटकाळे), रेवेवाडी (एम. जी. पवार), महमदाबाद (हु) (के. आर. खताळ), चिकलगी (एस. पी. कांबळे), जालीहाळ/सिध्दनकेरी (डी. डी. करे), हिवरगाव (एम. पी. जुंदळे) यांचा समावेश आहे. उपसरपंचाची निवड ही सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे. यावेळेस उपसरपंच निवडीला सरपंचांना मत देण्याचा अधिकार असून पहिले मत देऊनही समसमान झाल्यास दुसरे निर्णायक देण्याचा अधिकार त्यांना देण्यात आला. त्यामुळे काठावर विरोधक असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये सरपंच हे आपलाच उपसरपंच कसा होईल याकडे लक्ष देत आहेत.

# आ. समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे विकासरत्न आमदार समाधान आवताडे यांच्या ४७ व्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे. सदर कार्यक्रमामध्ये मंगळवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ०९ ते सायं.५ पर्यंत आमदार जनसंपर्क कार्यालय मंगळवेढा येथे रक्तदान शिबीर संपन्न होणार आहे.त्याचबरोबर २१ नोव्हेंबर पासून प्रत्येक गावोगावी पशुसंवर्धन विभाग व खाजगी पशुचिकित्सक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत परशु आरोग्य तपासणी व औषधोपचार हे पशु शिबीर संपन्न होणार आहे. या शिबीरामध्ये लाळ-खुरकत लस, मिनरल मिक्सर, जनता गोचीड नाशिक औषधे या आजारांवर मोफत उपचार उपलब्ध होणार आहेत. शनिवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ०९ ते सायं.५ पर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबिर अंतर्गत मोतीबिंदू तपासणी शस्त्रक्रिया व गरजूंना चष्मे वाटप होणार आहे. या शिबीरामध्ये डॉ.गणेश इंदुरकर, डॉ.निखिल तोष्णीवाल, डॉ.मनोज भायगुडे, डॉ.दौला ठेंगील, डॉ.नेमिनाथ खोत, डॉ. निनाद नागणे या नामवंत नेत्र तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली या शिबीरामध्ये रुग्णांची तपासणी व उपचार केले जाणार आहेत.



रविवार, दिनांक १० डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १० ते ३ पर्यंत मोफत जयपूर फूट नोंदणी व मोजमाप कृत्रिम हात व पाय या या कार्यक्रमाचे तनपुरे महाराज मठ पंढरपूर येथे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सामाजिक बांधिलकी जतन करण्याच्या अनुषंगाने पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांमध्ये आमदार समाधान आवताडे यांच्या संकल्पनेतून प्रथमच सर्वधर्मीय विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सर्व धर्मीय विवाह सोहळ्याचे नाव नोंदणी २१ नोव्हेंबर २०२३ पासून आमदार जनसंपर्क कार्यालय मंगळवेढा व अवताडे शुगर अँड डिस्टिलरीज प्रा लिमिटेड नंदूर येथे सुरू ठेवली जाणार आहे.२१ नोव्हेंबर २०२३ ते २६ नोव्हेंबर २०२३ दरम्यान दररोज सकाळी ५:३० ते ७:१५ या वेळेत मोफत योग विज्ञान शिबीराचे पतंजली योग परिवार यांनी आयोजन केले आहे. तरी वरील सर्व सामाजिक व आरोग्य कार्यक्रमांमध्ये सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वारी कालावधीत भाविकांसाठी उपलब्ध सुविधांची जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी केली पाहणी

पंढरपूर/प्रतिनिधीः कार्तिकी शुध्द एकादशी गुरूवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी असून, यात्रा कालावधी दि.१४ ते २७ नोव्हेंबर असा राहणार आहे. या कालावधीत यात्रा सुमारे ८ ते १० लाख भाविक येतात. यात्रा कालवधीत मंदीर समिती तसेच प्रशासनाकडून उपलब्ध करण्यात आलेल्या सोयी-सुविधांची पाहणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केली.कार्तिकी एकादशीचा सोहळा दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. पंढरपुरात मोठ्या प्रमाणत भाविक दाखल झाले आहे. भाविकांना सहज आणि सुलभरित्या दर्शन मिळावे यासाठी मंदीर समिती कडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांची पाहणी केली. मंदिर समितीकडून दर्शन रांगेत कुलर ,फॅन , पायाखाली मॅट ,मंडपाची व्यवस्था तसेच पोलीस सुरक्षासह वैद्यकीय यंत्रणा लाईव्ह दर्शन व्यवस्था तसेच प्रशासनाकडून भाविकांच्या आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या सुविधांची पाहणी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केली.



तसेच जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी वारकरी व भाविकांच्या सुरेक्षेसाठी पोलीस प्रशासनाकडून करण्यात आलेल्या सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली.यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्राशेड, विश्रांतीकक्ष, दर्शनरांग, ६५ एकर, महाआरोग्य शिबिर, वाखरी येथील पाहणी करुन संबिधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या.

यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे,अपर पोलीस अधिक्षक हिम्मत जाधव,प्रांताधिकारी गजानन गुरव, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव,कार्यकारी अभियंता अमित निंबकर, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता भिकाजी भोळे, तालुका आरोग्य डॉ. एकनाथ बोधले, तसेच संबधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी प्रशासनाकडून वारकरी भाविकांना देण्यात आलेल्या सोयी-सुविधांची माहिती दिली. तर मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदीर समितीकडून वारकरी-भाविकांना देण्यात आलेल्या सुविधांची माहिती दिली. तसेच नगरपालिका प्रशासनाकडून ६५ एकर, वाळवंट,पत्राशेड तसेच शहरात आरोग्याच्या दृष्टीने उपलब्ध सुविधा, अतिक्रमण मोहिम, शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाश व्यवस्था आदी बाबत माहिती दिली.

# ‘कार्तिकी’ यात्रेत पत्राशेडमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

पंढरपूर/प्रतिनिधीः यंदाच्या कार्तिकी यात्रेत दर्शनरांगेतील पत्राशेड येथे २१ ते २३ नोव्हेंबर या कालावधीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील, समर्थ युवा फाउंडेशन पुणे, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती तसेच कैवल्य वेल्फेअर फाउंडेशन पुणे यांच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती कैवल्य वेल्फेअर फाउंडेशनच्या अध्यक्षा ॲड. माधवी निगडे यांनी दिली. या शिबिरामध्ये रक्तातील साखर, छातीचा एक्स-रे, कोलेस्टेरॉल, रक्तदाब, रक्त तपासणी, कॅन्सर इत्यादी सर्व चाचण्या मोफत करण्यात येणार आहेत. सदरच्या चाचण्या करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती व अत्याधुनिक पध्दतीची मेडिकल चेकअप मोबाइल व्हॅन येथे असणार आहे. त्यासाठी मोहन औसेकर (९९२२५३१८००) व राहुल गावडे (९६०४४०४००६) यांच्याकडे नाव नोंदणी करून सदर शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जकराया देणार २७०० रुपयांचा पहिला हप्ता

मोहोळ/प्रतिनिधीः तालुक्यातील वटवटे येथील जकराया साखर कारखान्याने तालुक्यात सर्वोच्च दर देण्याची परंपरा यंदाच्या गळीत हंगाम तही कायम ठेवली असून चालू गळीत हंगामात (२०२३-२४) गाळपास येणाऱ्या उसाला २७०० रुपये प्रतिटनप्रमाणे पहिला हप्ता देण्याची घोषणा कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष ॲड. बी.बी. जाधव यांनी केली आहे.

काही अपवाद वगळता जिल्ह्यातील सर्वच कारखान्यांनी आपला पहिला हप्ता अडीच हजार रुपयांप्रमाणे जाहीर केला आहे. मोहोळ तालुक्यात भीमा, लोकनेते बाबूराव पाटील, आष्टी शुगर आणि जकराया हे चार कारखाने कार्यरत आहेत.

भीमा कारखान्याचे माजी अध्यक्ष खासदार धनंजय महाडिक यांनी जिल्ह्यात सर्वात पहिल्यांदा २५२५ रुपये पहिला हप्ता देण्याची घोषणा करून ऊसदराची कोंडी फोडण्यात पुढाकार घेतला आहे. जकराया साखर कारखान्याने मात्र भीमा, आष्टी आणि लोकनेते कारखान्याच्या पुढे एक पाऊल टाकत आपला २७०० रुपयांचा पहिला हप्ता एकरकमी जाहीर करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सुखद धक्का दिला आहे.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक सचिन जाधव, तज्ज्ञ संचालक राहुल जाधव, मुख्य शेती अधिकारी नानासाहेब बाबर, विजय महाजन, अनिल पवार, बाळासाहेब जाधव उपस्थित होते.